पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६० वा | बुधवार, दि. २७ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# गोकुळ साखर कारखान्याने १३० कोटींची ऊसबिलं गिळली; शेतकऱ्यांनी रस्त्यावर पेटवली चूल !

## गोकुळ शुगरविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या; डाळ-भात शिजवत आंदोलन तीव्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'जोपर्यंत खात्यात ऊस बिल जमा होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे नाही,' असा इशारा देत सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी आता आक्रमक झाले आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रिज लिमिटेड या खासगी साखर कारखान्याने तब्बल १३० कोटी ४६ लाख रुपयांची एफआरपी थकवल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनस्थळीच चूल पेटवून डाळ-भात शिजवत शेतकरी दिवस काढत असून प्रशासन आणि कारखानदारांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या दोन दिवसांपासून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच ठाण मांडले आहे. ‌‌ह्लआमचा ऊस गाळप करून कारखानदारांनी कोट्यवधींचा व्यवसाय केला; पण शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशासाठी आम्हालाच रस्त्यावर यावे लागत आहे,ह्व अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी दिली.

**रस्त्यावरच चूल, डाळ-भात आणि संघर्ष**

आंदोलन अधिक तीव्र करत शेतकऱ्यांनी आंदोलनस्थळीच चूल पेटवून डाळ-भात शिजवण्यास सुरुवात केली आहे. 'सरकार आणि कारखानदारांना आमच्या वेदना दिसत नसतील, तर आम्ही रस्त्यावरच जगून दाखवू,' अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलनाचे तीव्र आणि भावनिक चित्र पाहायला मिळत आहे.

आंदोलनातील शेतकरी अमोल पाटील यांनी सांगितले की, 'जोपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर थकीत ऊसबिलाची रक्कम जमा होत नाही, तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाही. प्रशासनाने फक्त आदेश देऊन चालणार नाही; पैसे प्रत्यक्ष खात्यात आले पाहिजेत.'

**कारखान्यावर जप्तीचे आदेश**

शेतकऱ्यांच्या आंदोलनाची



दखल घेत साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी गोकुळ शुगर इंडस्ट्रीजवर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. कारखान्याची साखर, मोलॅसिस आणि बगॅस जप्त करून त्यांची विक्री करत शेतकऱ्यांची थकबाकी वसूल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ऊस गाळप हंगाम २०२५-२६ मधील एफआरपीची तब्बल १३० कोटी ४६ लाख २५ हजार रुपयांची रक्कम कारखान्याकडे थकीत आहे. याशिवाय विलंबामुळे १५ टक्के दराने व्याजही आकारण्यात येणार आहे.

**१४ दिवसांत एफआरपी देणे बंधनकारक**

ऊस (नियंत्रण) आदेशानुसार, गाळप केलेल्या उसाची एफआरपी संबंधित शेतकऱ्यांना १४ दिवसांच्या आत देणे प्रत्येक साखर कारखान्यावर बंधनकारक आहे. मुदतीत पैसे न दिल्यास थकीत रकमेवर १५ टक्के व्याज आकारण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र गोकुळ शुगर इंडस्ट्रीजने ही नियमावली धाब्यावर बसवत शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये अडकवून ठेवले आहेत.

इतकेच नव्हे तर सोलापूर प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाने हंगाम २०२५-२६ संदभार्तील गाळप, एफआरपी, ऊसतोडणी व वाहतूक खर्चाची माहिती मागवूनही कारखान्याकडून आवश्यक माहिती सादर करण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे.

**तीस गावांतील शेतकरी आंदोलनात**

या आंदोलनात सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील तीसपेक्षा अधिक गावांतील शेतकरी सहभागी झाले आहेत. अरविंद घोडके, अंबादास शिवशंकर, सचिन जवळगे, प्रशांत सुरवसे, गणेश नरे यांच्यासह अनेक शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

**'ऊस घेतला, पैसे गिळले; आता शेतकरी रस्त्यावर'**

दरम्यान, या प्रकरणामुळे खासगी साखर कारखान्यांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एकीकडे शेतकरी कर्ज, दुष्काळ आणि वाढत्या उत्पादन खचार्मुळे आर्थिक संकटात सापडले असताना दुसरीकडे त्यांच्या हक्काच्या एफआरपीसाठी त्यांनाच रस्त्यावर उतरावे लागत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

# शेतकरी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी काँग्रेसचे भव्य रस्ता रोको आंदोलन

## भाजप सरकारच्या धोरणांवर खा प्रणिती शिंदे यांची जोरदार टीका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने मार्केट यार्ड चौक, सोलापूर येथे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर भव्य जनआक्रोश रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

सोयाबीन पीक विमा, कांद्याला हमीभाव, पेट्रोल-डिझेल व गॅस दरवाढ, इंधन तुटवडा, खत-बियाण्यांच्या वाढत्या किंमती, महागाई तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत भाजप महायुती सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी भाजप व महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या की, राज्यातील शेतकरी आज अत्यंत संकटात असून भाजप महायुती सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे बळीराजावर मुद्दाम संकट आणले जात आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य जनतेचे जगणे कठीण झाले आहे. डिझेलचे वाढते दर आणि इंधन तुटवड्याचा थेट परिणाम शेतीवर होत असून शेतकऱ्यांना शेती मशागत करणेही अवघड झाले आहे.

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, खतांच्या किंमती प्रचंड वाढल्या असून खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी





ह्लखते वापरू नकाह्व असे केलेले वक्तव्य हे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे आहे. खते वापरायची नाहीत तर शेती करायची कशी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले की, सोयाबीन, तूर आणि कांद्यासारख्या पिकांना हमीभाव मिळत नाही, पीक विमा मिळत नाही आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. देशात युद्ध नसतानाही महागाईचा प्रचंड भडका उडाला असून सामान्य माणूस आणि शेतकरी यांना त्याची मोठी झळ बसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक आणि परराष्ट्र धोरणांमुळे देशातील परिस्थिती बिकट झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

सत्ताधाऱ्यांच्या वाळू तस्करीमुळे आणि नदीपात्रातील वाळू उपशामुळे शेतीपर्यंत पाणी पोहोचण्यात विलंब होत असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी सांगितले की, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. हे सरकार केवळ उद्योगपतींसाठी काम करत असून सामान्य माणूस आणि शेतकरी यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीकाही खासदार प्रणिती शिंदे यांनी केली.

आंदोलनादरम्यान काही शेतकऱ्यांनी आणि उत्तर सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भारत जाधव यांनी सरकारच्या निषेधार्थ मुंडन केले. याबाबत बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, ही फक्त सुरुवात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी जनआक्रोश आणखी तीव्र होणार आहे. आम्ही झुकणार नाही आणि बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.

या देशाचा कणा शेतकरी आहे. शेतकरी संकटात असताना आम्ही गप्प बसणार नाही. भाजप महायुती सरकार पोलिसांचा दबाव टाकून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सुरू झालेला हा लढा अधिक तीव्र होईल. ये तो झांकी है, आगे और लड़ाई बाकी है, असा इशाराही खासदार प्रणिती शिंदे यांनी दिला.

सरकारने शेतकऱ्यांकडे पाठ फिरवली असली तरी काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांसोबत ठामपणे उभा आहे. ही रस्त्यावरची लढाई असून शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही, असे आवाहन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.

यावेळी सोलापूर पूर्व जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार, सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, तालुका अध्यक्ष उत्तर सोलापूर अध्यक्ष भारत जाधव, दक्षिण सोलापूर अध्यक्ष भीमाशंकर जमादार, पंढरपूर अध्यक्ष संदीप पाटील पंढरपूर, मंगळवेढा अध्यक्ष प्रशांत साळे, मोहोळ अध्यक्ष सुलेमान तांबोळी मोहोळ, मोहोळ शहर अध्यक्ष किशोर पवार, मंगळवेढा शहर अध्यक्ष अँड. राहुल घुले, प्रदेश सचिव शाहिनताई शेख, अँड. रवीकरण कोळेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष अशपाक बळोरगी, माजी महापौर सुशिलाताई आबुटे, नगरसेवक नरसिंह आसादे, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, मनोज यलगुलवार, अँड. अर्जुनराव पाटील, प्रा. सिद्राम सलवदे, सुरेश अप्पा शिवपुजे, अँड. संजय गायकवाड माजी सदस्य जिल्हा परिषद, सचिन गुंड, मुस्तफा बळोरगी, काकासाहेब पाटील जेऊर, प्रदेश सचिव राहुल वर्धा, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, दक्षिण युवक अध्यक्ष अनंत म्हेत्रे, अल्पसंख्यांक अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, गजानन जक्कीकोरे, राघवेंद्र बिराजदार, संदीप शिंदे, आरीफ पठाण, इन्नूस कांबळे, दत्तात्रय सावंत, कृष्णदेव वाघमोडे, राजेंद्र लांडे, ज्ञानदेव कदम, बिरा खरात, दाजी कोकाटे, नंदा कांबळे, सुरेखा जाधव, अंजली वस्त्रे, रतन डोळसे, अंजली मोहिते, रेणुका बिराजदार, बालाजी जमादार, शब्बीर नदाफ, अलकाताई लोकरे, दत्तात्रय गजबार, अशोक कस्तुरे, संतोष शिंदे, रशीद पठाण, अँड. लक्ष्मण बनसोडे, सजेर्राव पाटील, बाबा गाडे, अरुण उबाळे, मीजाज जागीरदार, बसवराज पाटील, महांतेश हत्तुरे, मयुरी वाघमारे, अंजना कुचेकर, प्रा. भोजराज पवार, बाबुराव म्हेत्रे, शिवशंकर अंजनाळकर, परशुराम सतारेवाले, शिरीष चव्हाण, तिरुपती परकीपंडला, महेश लोंढे, शरद गुमटे, सुभाष वाघमारे, सुनील सारंगी उपाध्यक्ष, रामसिंग आंबेवाले, बसवराज म्हेत्रे, राजन कामात, सिद्राम सलवदे सर, अनिल मस्के, अशोक कलशेट्टी, गिरीधर थोरात, लखन गायकवाड, संजय गायकवाड, सागर उबाळे, भीमराव शिंदे, रमेश फुले, प्रवीण जाधव, विवेक इंगळे, नूरअहमद नलवार, बालाजी जाधव, नागेश बोमड्यल, प्रभाकर गोंट्याल, रवी आंबेवाले, माजी महिला अध्यक्ष अँड. करीमुनिसा बागवान, शोभा बोबे, मुमताज तांबोळी, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, छाया हिरवटे, निशा मरोड, धीरज खंदारे, प्रतीक शिंगे, व्यंकटेश बोमेन, महेंद्र शिंदे, दिनेश डोंगरे, आकाश जांभळे, एजाज बागवान, मेघश्याम गौडा, राजेश झंपले, मोहसीन फुलारी, दशरथ सामल, आप्पा सलगर, कालिदास काळपगार, चंद्रकांत टिक्के, चंदू नाईक, अभिलाष अच्युगटला, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागेश म्हेत्रे मित्र परिवारातर्फे नूतन खासदार, नगरसेवक व गुणवंतांचा भव्य सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागेश म्हेत्रे मित्र परिवाराच्या वतीने मोची समाजातील नूतन खासदार, नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ शनिवार, दि. 30 मे रोजी सायंकाळी 5 वाजता मोदी येथील अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पद्माकर देव सभागृहात आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या कार्यक्रमात मोची समाजातून खासदार म्हणून निवड झालेल्या प्रा. डॉ. सौ. ज्योतीताई वाघमारे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर समाजातील नूतन नगरसेवक प्रा. नरसिंग आसादे, मधुसुदन जंगम, सौ. निर्मला जंगम, स्वीकृत नगरसेवक ऋषिकेश मेट्रे तसेच नूतन रेल्वे बोर्ड सदस्य दिनेश म्हेत्रे यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात समाजातील विविध शासकीय व निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असून, इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह



आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात येणार आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींनाही या निमित्ताने सन्मानित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ नेते सुधीरजी खरटमल हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, मोची समाज शहराध्यक्ष सैदप्पा जंगडेकर यांच्यासह समाजातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले करिअर मार्गदर्शन सत्र. '10 वी-12 वी नंतर काय?' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ड्रिम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांचे विशेष मार्गदर्शन व व्याख्यान होणार आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातील शिक्षण, करिअरच्या संधी, विविध अभ्यासक्रमांची माहिती आणि योग्य दिशा याबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी या सत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांनी सत्कारासाठी आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले असून यासाठी 9307110081 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजातील नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा गौरव, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि युवकांना करिअरविषयक मार्गदर्शन अशा त्रिसूत्री उपक्रमामुळे हा कार्यक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेस नागेश म्हेत्रे, काशीनाथ भतगुणकी, रविकांत मस्के, मारुती पवार, एजाज शेख, सर्फराज नदाफ आदी उपस्थित होते.

# विधानपरिषद निवडणूक, नामनिर्देशन अर्ज स्वीकृतीचे वेळापत्रक जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक १८ मे २०२६ अन्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार आदर्श आचारसंहिता दिनांक १८ मे २०२६ पासून लागू करण्यात आलेली आहे.

सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा कालावधी दिनांक २५ मे २०२६ ते ०१ जून २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये दिनांक २८ मे रोजी बकरी ईद व दिनांक ३१ मे रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असल्याने हे दोन दिवस वगळून दिनांक २५, २६, २७, २९, ३० मे तसेच ०१ जून रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार आहेत.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन यांनी सर्व संबंधितांना वरील वेळापत्रकानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे.

# सर्व कंपन्यांनी पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे ठेवणे आवश्यक - जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याला पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या सर्व कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणात बफर स्टॉक उपलब्ध ठेवावा. तसेच दैनंदिन मागणीप्रमाणे जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात इंधनपुरवठा सुरळीतपणे ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात (दि. 25)पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या





कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार, बीपीसीएलचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण यादव, संजयकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण, निकीत रेड्डी व आयओसीएलचे सागर गौतम, तन्मय आनंद, आयएमसील कंपनीचे नंदकिशोर अडसुळे, अनिल करीर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन पुढे म्हणाले की, काही पेट्रोल विक्रेत्याकडून कंपनीने दररोज काही मर्यादेतच पेट्रोल, डिझेल विक्री करावी असे बंधने घातल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या आहेत. तरी सर्व संबंधित कंपन्यांनी जिल्हा प्रशासनाच्या परवानगीशिवाय पेट्रोल विक्रेत्यावर इंधन विक्रीचे कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. यापुढे अशा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येऊ नये, तसेच इंधनपुरवठा सोलापूर शहरासह ग्रामीण भागात ही सुरळीतपणे सुरू राहील याबाबत दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पेट्रोल डिझेल पुरवठ्याच्या अनुषंगाने काळजी करू नये जिल्ह्यात मुबलक प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असून कंपन्यांना दररोज नियमित मागणीप्रमाणे पेट्रोल डिझेल उपलब्ध केले जात आहे. विशेषतः जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेलचा अतिरिक्त साठा करून ठेवू नये, असेही आवाहन जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी केले आहे. तसेच उठॠ गॅस पुरवठ्यात ही कंपनीने मागणीप्रमाणे वाढ करावी.

प्रारंभी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्याकडून सर्व पेट्रोल डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कंपन्यांची रोजची पेट्रोल व डिझेलची मागणी व त्याप्रमाणे कशा पद्धतीने पुरवठा होत आहे याविषयी माहिती घेण्यात आली. तसेच गॅस पुरवठा कशा पद्धतीने केला जात आहे व त्यात मोठ्या प्रमाणात वाढ करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच कंपन्यांकडून किमान सात दिवसाचा पेट्रोल व डिझेलचा बफर स्टॉक ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले तसेच सोलापूर शहर व ग्रामीण भागात मागणीप्रमाणे पेट्रोल व डिझेल पुरवठा रोजचा रोज उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले.

जिल्ह्यातील सर्व डीलर व विक्रेते यांच्या पेट्रोल व डिझेल च्या अनुषंगाने अडीअडचणी जाऊन घेतल्या व ग्राहकांना इंधन पुरवठा सुरळीत करावा, (पान 2 वर..)

## संपादकीय

# बारा वाजले की बदलाची वेळ आली? – प्रश्न सत्ता कोणाची नाही, व्यवस्थेचा आहे

भारतीय लोकशाहीत सत्ताबदल हा केवळ राजकीय कार्यक्रम नसतो; तो जनतेच्या अपेक्षा, विश्वास आणि भ्रमनिरासाचा प्रवास असतो. एकेकाळी भ्रष्टाचारविरोध, विकास, पारदर्शकता आणि "अच्छे दिन" यांच्या घोषणा देत सत्तेवर आलेल्या नेतृत्वाकडून देशाला मोठ्या आशा होत्या. मात्र दशक उलटताना आज अनेक प्रश्न जनतेच्या मनात आहेत. हे प्रश्न एखाद्या पक्षविरोधी रागाचे नाहीत; ते देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि लोकशाही आरोग्याशी संबंधित आहेत.

"कुशासन, चौपट कर्ज, घसरता रुपया, बेरोजगारी, महागाई" हे शब्द आता केवळ विरोधी पक्षांच्या भाषणापुरते राहिलेले नाहीत. घराघरात, चहाच्या टपऱ्यांवर, शेतात आणि नोकरीच्या शोधात फिरणाऱ्या तरुणांच्या चर्चेतही हेच विषय आहेत. देशाच्या एकूण कर्जात प्रचंड वाढ झाली. रुपया डॉलरसमोर कमकुवत झाला. पेट्रोल, डाळी, गॅस, शिक्षण आणि आरोग्याचे खर्च सामान्य माणसाच्या खिशाला चटके देत राहिले. विकासाच्या घोषणांचा गजर झाला, पण सामान्य माणसाच्या जीवनात अपेक्षित बदल कितपत झाला, हा खरा प्रश्न आहे.

नोटाबंदी हे त्याचं सर्वात मोठं उदाहरण. काळा पैसा, दहशतवाद आणि बनावट नोटांवर लगाम लावण्यासाठी घेतलेला निर्णय म्हणून त्याचं कौतुक करण्यात आलं. पण आजही विचारलं जातं – त्यातून नेमकं काय साध्य झालं? लाखो छोट्या उद्योगांवर त्याचा परिणाम झाला, रोजगार कमी झाले, असंघटित क्षेत्राची कंबर मोडली. त्यानंतरचा लॉकडाऊन — अचानक, नियोजनाविना लागू झालेला — स्थलांतरित मजुरांच्या दुःखद पलायनाचं प्रतीक ठरला. महामार्गावर पायपीट करणाऱ्या लोकांचे फोटो हा आधुनिक भारताच्या इतिहासावरचा काळा डाग ठरला.

सरकारी कंपन्यांच्या विक्रीचा मुद्दा देखील तितकाच गंभीर आहे. एकेकाळी राष्ट्रनिर्मितीची प्रतीके असलेल्या संस्था खासगीकरणाच्या रांगेत उभ्या राहिल्या. समर्थक म्हणतात हा आर्थिक सुधारणांचा भाग आहे; पण विरोधकांचा प्रश्न असा — देशाची संपत्ती मोजक्या उद्योगसमूहांकडे केंद्रित होत आहे का? "अदानीकरण" हा शब्द विरोधकांनी तयार केला असला, तरी त्यामागचा मुद्दा उद्योग आणि सत्तेच्या नात्याबाबत संशय निर्माण करणारा आहे.

लोकशाहीच्या चौकटीतील संस्थांच्या स्वायत्ततेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. ईडी, सीबीआय, आयकर विभाग यांचा वापर राजकीय दबावासाठी होतो का, अशी चर्चा वारंवार होते. निवडणुकीपूर्वी विरोधकांवर कारवाया आणि नंतर काही जणांचे सत्ताधारी पक्षात स्वागत हा योगायोग मानायचा का? इलेक्टोरल बाँड्स प्रकरणाने तर राजकीय निधी व्यवस्थेतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उभे केले.

न्यायव्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित झाले. न्यायाधीशांच्या नियुक्त्या, निवृत्तीनंतरच्या नियुक्त्या, आणि काही निर्णयांच्या पार्श्वभूमीवर "संस्थात्मक स्वायत्तता" हा मुद्दा चर्चेत राहिला. लोकशाहीत संस्था मजबूत असाव्यात, व्यक्ती नव्हे; पण व्यक्तिकेंद्री राजकारण अधिक बळकट झाल्याचं चित्र दिसतं.

परराष्ट्र धोरणावर देखील प्रश्न उपस्थित झाले. जगभर दौरे, मिठ्या, मोठे कार्यक्रम आणि प्रतिमानिर्मिती यामध्ये भारताची उपस्थिती वाढली हे खरे; पण शेजारी राष्ट्रांशी संबंध, सीमावाद, आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताचा प्रभाव यावर मतभेद आहेत. "एकही खरा मित्र नाही" ही टीका अतिशयोक्ती असू शकते; पण ती निर्माण होण्यामागील कारणांचा विचार व्हायलाच हवा.

सामाजिक पातळीवर वातावरण अधिक ध्रुवीकरणाकडे गेल्याची टीका होते. धर्म, जात, राष्ट्रवाद यांचा राजकीय वापर वाढल्याचं दिसतं. मॉब लिंचिंग, द्वेषपूर्ण भाषणं, समाजमाध्यमांवरील विषारी प्रचार आणि सततचा "आम्ही विरुद्ध ते" असा संघर्ष समाजासाठी धोक्याचा आहे. राष्ट्रवाद जर मतांसाठी वापरला गेला, तर तो एकतेपेक्षा विभाजन अधिक निर्माण करतो.

माध्यमांची भूमिकाही या काळात चर्चेत राहिली. सत्तेला प्रश्न विचारण्याऐवजी स्तुती करणारी माध्यमं वाढली, अशी टीका झाली. लोकशाहीचा चौथा स्तंभ जर सत्तेच्या प्रचारयंत्रणेचा भाग बनू लागला, तर लोकशाहीचा आत्माच धोक्यात येतो.

पक्षफोडे, सत्तेसाठी होणारे राजकीय प्रयोग, विरोधी नेत्यांचे अचानक झालेले "शुद्धीकरण", हे देखील या काळाचं वैशिष्ट्य ठरलं. भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून टीका होणारे नेते सत्तेत आल्यावर अचानक स्वच्छ कसे होतात, हा प्रश्न सामान्य माणसाला पडतो.

मात्र या सर्वांमध्ये एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल — लोकशाहीत कोणतीही सत्ता अंतिम नसते. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हे देशविरोधी नाही, तर लोकशाहीचे कर्तव्य आहे. त्याचवेळी टीका करताना तथ्य, संयम आणि प्रामाणिकता आवश्यक असते.

"बारा वाजले" हे केवळ उपहासात्मक वाक्प्रचार नसून तो इशारा आहे — व्यक्तिपूजा, अंधभक्ती आणि प्रश्न विचारण्याची भीती लोकशाहीसाठी घातक आहे. प्रश्न हा एका पक्षाचा नाही. प्रश्न असा आहे की, आपण राष्ट्राला संस्थांच्या बळावर उभं करतोय की व्यक्तींच्या प्रतिमांवर?

देशाला घोषणांची नव्हे, तर उत्तरांची गरज आहे. कारण शेवटी जनतेच्या घड्याळात काटे फिरतच असतात — आणि लोकशाहीत वेळ बदलायला फार उशीर लागत नाही.

# रमाबाई आंबेडकर : संघर्षातील शांत शक्ती

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा विचार करताना त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर खंबीरपणे उभ्या राहिलेल्या रमाबाई आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने स्मरणात येते. भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय, अस्पृश्यता, गरिबी, सामाजिक बहिष्कार आणि मानवी अपमानाच्या काळोखात बाबासाहेबांनी उभी केलेली परिवर्तनाची मशाल तेजाने प्रज्वलित राहिली, त्यामागे रमाबाईंचे त्यागमय जीवन आणि शांत पण समर्थ सहकार्य मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. बाबासाहेबांच्या आयुष्याचा इतिहास जितका संघर्षाचा आहे, तितकाच तो रमाईंच्या त्यागाचा आणि सहनशीलतेचाही आहे. म्हणूनच २७ मे रोजी येणारा रमाबाई आंबेडकर स्मृतिदिन हा केवळ एका व्यक्तीच्या स्मृतीचा दिवस नसून त्याग, समर्पण, सहनशीलता आणि स्त्रीशक्तीच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण करणारा दिवस आहे.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी कोकणातील दापोली तालुक्यातील वणंद या गावात झाला. त्यांचे वडील भिकू धुतरे हे अत्यंत गरीब कुटुंबातील मेहनती व्यक्ती होते. लहान वयातच रमाबाईंच्या आयुष्यात दुःखाचे सावट आले. आई–वडिलांचे निधन झाल्यानंतर त्यांचे बालपण अत्यंत हालअपेष्टांत गेले. आर्थिक अडचणी, उपासमार, असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष अशा परिस्थितीत त्यांचे बालजीवन घडले. त्या काळात मुलींना शिक्षणाची संधी नव्हतीच; त्यात दलित समाजातील मुलींची अवस्था अधिकच बिकट होती. त्यामुळे रमाबाई औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिल्या. परंतु जीवनाच्या कठोर अनुभवांनी त्यांना प्रगल्भ बनवले.

१९०६ मध्ये अवघ्या नऊ वर्षांच्या रमाबाईंचा विवाह पंधरा वर्षीय भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह जरी पारंपरिक पद्धतीने झाला असला तरी पुढे या नात्याने भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. विवाहानंतर रमाबाईंच्या आयुष्यात संघर्ष अधिकच वाढला. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी झटत होते. त्यांना शिक्षणाची प्रचंड ओढ होती आणि त्यासाठी आर्थिक संकटांशी सतत लढावे लागत होते. अशा वेळी रमाबाई यांनी संसाराचा संपूर्ण भार स्वतःच्या खांद्यावर घेतला. अत्यंत गरिबीत संसार चालवताना त्यांनी कधीही तक्रार केली नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छा–आकांक्षांचा पूर्णतः त्याग केला.

त्या काळातील परिस्थिती अत्यंत कठीण होती. घरात अनेकदा अन्नधान्य नसे, मुलांचे संगोपन करणे कठीण जाई, आजारपण आणि आर्थिक विवंचना कायम असत. बाबासाहेब विदेशात शिक्षण घेत असताना रमाबाई मुंबईत अत्यंत हालअपेष्टा सहन करत होत्या. संसार चालवण्यासाठी त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. काही वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागत, तरीही त्यांनी बाबासाहेबांना कधीही शिक्षण सोडून परत येण्यास सांगितले नाही. त्यांच्या मनात बाबासाहेबांच्या ध्येयाबद्दल प्रचंड विश्वास होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे उद्धारकार्य बाबासाहेब करणार आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या वेदना मनात ठेवून बाबासाहेबांना सतत प्रेरणा दिली.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत आणि संयमी होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा दिखाऊपणा आवडत नसे. साधी राहणी, परिश्रमशील वृत्ती आणि कुटुंबाविषयी अपार प्रेम हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. संकटांच्या काळात त्या देवभक्तीतून मानसिक बळ मिळवत असत. बाबासाहेब मात्र तर्कवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले होते. तरीही या दोघांमध्ये परस्पर आदर आणि समजूतदारपणा कायम राहिला. बाबासाहेबांनी अनेकदा रमाबाईंच्या सहनशीलतेचा आणि त्यागाचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे त्यांच्या मुलांचे निधन. त्यांना एकूण पाच अपत्ये झाली; परंतु त्यापैकी बहुतेक मुलांचे लहान वयातच निधन झाले. दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे त्यांना आपल्या लेकरांना गमवावे लागले. या दुःखाने रमाबाई आतून खचून गेल्या होत्या. मातृत्वाच्या असंख्य वेदना त्यांनी सहन केल्या. तरीही त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यात कधी अडथळा आणला नाही. उलट त्यांच्या मानसिक स्थैर्याला आधार देण्याचा प्रयत्न केला. एका आईच्या आणि पत्नीच्या भूमिकेत त्यांनी केलेला त्याग अनमोल आहे.

बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा संघर्ष होता. अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, शिक्षणासाठीचा संघर्ष, सामाजिक न्यायासाठीचे आंदोलन, कायद्याचा अभ्यास, राजकीय जबाबदाऱ्या आणि समाजजागृती या सर्व क्षेत्रांत बाबासाहेब कार्यरत होते. या प्रत्येक टप्प्यावर रमाबाई त्यांच्यासोबत सावलीसारख्या उभ्या राहिल्या. त्यांनी स्वतःला कधीही पुढे आणले नाही; परंतु बाबासाहेबांच्या यशामागे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहण्यासाठी जी मानसिक ताकद लागते, ती रमाबाईंकडे होती.

महाड सत्याग्रह, चवदार तळ्याचा लढा, मंदिरप्रवेश आंदोलन, गोलमेज परिषद यांसारख्या ऐतिहासिक घटनांच्या काळात बाबासाहेबांचे जीवन अत्यंत व्यस्त आणि संघर्षमय होते. या काळात रमाबाई घराची जबाबदारी सांभाळत होत्या. आर्थिक ताण, सामाजिक दबाव आणि वैयक्तिक दुःख यांचा सामना करत त्यांनी बाबासाहेबांना मानसिक आधार दिला. एका अर्थाने बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीला आवश्यक असलेली भावनिक शक्ती रमाबाईंकडूनच मिळत होती.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात असलेली सहनशीलता आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी कधीही स्वतःच्या दुःखाचे प्रदर्शन केले नाही. गरिबी, उपासमार, आजारपण, मुलांचे मृत्यू आणि सामाजिक अपमान या सर्व संकटांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. त्यांच्या आयुष्याचा विचार केला तर लक्षात येते की त्या केवळ एका महान व्यक्तीच्या पत्नी नव्हत्या, तर स्वतःमध्येही एक महान व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे योगदान शब्दांत मांडणे कठीण आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची संवेदनशीलता. घरात कोणीही उपाशी राहू नये, गरजू व्यक्तींना मदत करावी, संकटात असलेल्या लोकांना धीर द्यावा, अशी त्यांची वृत्ती होती. अत्यंत गरिबीत राहूनही त्यांनी माणुसकी जपली. त्यांचे जीवन हे करुणा आणि सहअस्तित्वाचे उदाहरण होते. त्या काळातील दलित स्त्रियांच्या जीवनातील दुःख आणि संघर्ष रमाबाईंच्या जीवनातून स्पष्टपणे दिसून येतात.



स्त्रीशक्तीचा विचार करताना अनेकदा समाज केवळ प्रसिद्ध आणि सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या महिलांकडे पाहतो; परंतु घराच्या चार भिंतीत राहून समाजपरिवर्तनाच्या महान कार्याला आधार देणाऱ्या स्त्रियांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. रमाबाई यांचे जीवन हे अशा स्त्रीशक्तीचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी कुटुंब, संसार आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना दाखवलेली संयमशीलता आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या लेखनात आणि भाषणांत रमाबाईंच्या त्यागाचा उल्लेख केला आहे. त्यांनी रमाबाईंना अत्यंत प्रेमाने 'रमा' किंवा 'रामू' असे संबोधले. बाबासाहेबांच्या आयुष्यात रमाबाईंचे स्थान किती महत्त्वाचे होते, हे त्यांच्या अनेक आठवणींमधून दिसून येते. बाबासाहेबांनी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षात रमाबाईंचे सहकार्य नसते, तर कदाचित इतिहासाची दिशा वेगळी असती. कारण संघर्षाच्या काळात मानसिक आधार देणारी व्यक्तीच एखाद्याला मोठ्या ध्येयासाठी लढण्याची शक्ती देते.

रमाबाईंचे आरोग्य पुढे खालावत गेले. सततची गरिबी, कष्ट, अपुरी आहारव्यवस्था आणि मानसिक ताण यामुळे त्यांची प्रकृती ढासळली. बाबासाहेब त्या काळात अत्यंत व्यस्त होते. समाजकारण, राजकारण आणि कायदेविषयक कामांमध्ये त्यांचा वेळ जात होता. तरीही रमाबाईंच्या प्रकृतीबद्दल त्यांना सतत चिंता वाटत असे. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाबाईंचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने बाबासाहेब अत्यंत दुःखी झाले. त्यांनी आपल्या आयुष्यातील एक मोठा आधार गमावला होता.

रमाबाईंच्या निधनानंतर बाबासाहेब काही काळ अत्यंत खचून गेले होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासात ज्यांच्यावर सर्वाधिक विश्वास ठेवला, ती व्यक्ती त्यांच्यापासून दूर गेली होती. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या स्मरणार्थ अनेकदा भावनिक शब्दांत आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या जीवनातील त्यागाचे मोल त्यांनी मनापासून मान्य केले.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे जीवन नव्या पिढीसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की मोठ्या परिवर्तनामागे अनेक अनामिक त्याग असतात. समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे, विशेषतः स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. रमाबाईंचे जीवन हे स्त्रीशक्तीच्या संयमी आणि समर्पित रूपाचे प्रतीक आहे.

समाजात आजही अनेक महिला विविध संकटांचा सामना करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक दबाव आणि असमानता या समस्यांमध्येही त्या कुटुंब आणि समाजासाठी झटत आहेत. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यांचा त्याग हा केवळ वैयक्तिक नव्हता; तो सामाजिक परिवर्तनासाठी दिलेला मूक वाटा होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे कार्य आणि योगदान समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. अनेकदा इतिहासात मोठ्या व्यक्तींची नावे प्रसिद्ध होतात; परंतु त्यांच्या संघर्षात सहभागी असलेल्या व्यक्ती दुर्लक्षित राहतात. रमाबाईंचे जीवन हे अशाच दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या योगदानाचे उदाहरण आहे. त्यांच्या स्मृती जतन करणे म्हणजे समाजातील त्याग, सहनशीलता आणि माणुसकीच्या मूल्यांना जपणे होय.

भारतीय स्त्रीच्या संघर्षमय जीवनाचे एक प्रभावी चित्र रमाबाईंच्या आयुष्यातून दिसते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य गमावले नाही. कुटुंबासाठी, पतीच्या ध्येयासाठी आणि मुलांसाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण फार कमी होते; परंतु त्यांनी दुःखाला शरण न जाता त्यातून जगण्याची ताकद निर्माण केली.

रमाबाईंच्या जीवनाचा अभ्यास करताना त्या काळातील सामाजिक परिस्थितीही समजून घ्यावी लागते. दलित समाजावर होणारा अन्याय, अस्पृश्यतेमुळे मिळणारी अमानुष वागणूक, शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि सामाजिक बहिष्कार या सगळ्या परिस्थितीत रमाबाई जगत होत्या. अशा काळात त्यांनी बाबासाहेबांना केवळ साथच दिली नाही, तर त्यांच्या ध्येयासाठी स्वतःचे जीवन वाहून घेतले.

आज अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांद्वारे रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृती जपल्या जात आहेत. त्यांच्या नावाने महिला वसतिगृहे, शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि स्मारके उभारण्यात आली आहेत. हे केवळ स्मरणाचे प्रतीक नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घेऊन महिलांनी शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

रमाबाईंचे जीवन हे त्यागाच्या माध्यमातून इतिहास घडवणाऱ्या स्त्रीचे उदाहरण आहे. त्यांनी स्वतःचे आयुष्य प्रसिद्धीसाठी जगले नाही. त्यांना कोणत्याही पदाची किंवा सत्तेची अपेक्षा नव्हती. त्यांचे ध्येय केवळ कुटुंब आणि बाबासाहेबांच्या स्वप्नांना आधार देणे हेच होते. म्हणूनच त्यांचे योगदान अधिक मोठे वाटते. आजच्या भौतिकवादी युगात त्यांचे साधेपण आणि समर्पण समाजाला माणुसकीची जाणीव करून देते.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची मानसिक ताकद. संकटांच्या काळात अनेकजण खचून जातात; परंतु रमाबाई संकटांतही शांत राहिल्या. त्यांनी दुःख सहन केले, पण धैर्य सोडले नाही. त्यांच्या या वृत्तीमुळे बाबासाहेबांना समाजकार्यासाठी आवश्यक स्थैर्य मिळाले. त्यांचे जीवन हे मानसिक सामर्थ्याचे जिवंत उदाहरण आहे.

स्त्री–पुरुष समानतेच्या विचारांचा पाया मजबूत करण्यासाठी रमाबाईंचे जीवन अभ्यासणे आवश्यक आहे. स्त्रीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसते; ती समाजपरिवर्तनाची महत्त्वाची भागीदार असते. रमाबाई यांनी हे आपल्या आयुष्यातून सिद्ध केले. त्यांचे योगदान सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे, इतके मोठे आहे.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. त्याग, संयम, माणुसकी, सहकार्य आणि ध्येयनिष्ठा या मूल्यांची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. वाढती स्पर्धा, स्वार्थी वृत्ती आणि नातेसंबंधांमधील ताण यांच्या काळात रमाबाईंचे जीवन आपल्याला संवेदनशीलतेचा आणि नात्यांमधील विश्वासाचा संदेश देते.

रमाबाई आंबेडकर या नावात केवळ एका स्त्रीची ओळख नाही, तर संघर्षातून उभ्या राहिलेल्या भारतीय स्त्रीचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांच्याशी सामना केला. त्यांनी दुःखाला स्वीकारले, पण आशा सोडली नाही. त्यांच्या जीवनाचा विचार करताना मनात आदर आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होते.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी. कष्ट, त्याग आणि समर्पण यांच्यामुळेच मोठे परिवर्तन घडते, हा संदेश त्यांच्या आयुष्यातून मिळतो. आज महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होत असली तरी त्यासाठी आवश्यक असलेली मूल्ये रमाबाईंच्या जीवनात स्पष्टपणे दिसतात. आत्मविश्वास, सहनशीलता आणि कुटुंबाविषयीची जबाबदारी यांचा सुंदर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनाचे महत्त्व केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास शाळा, महाविद्यालये आणि समाजसंस्थांमध्ये व्हायला हवा. त्यांच्या त्यागमय जीवनाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचल्यास समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव वाढेल. बाबासाहेबांच्या कार्याची मुळे समजून घ्यायची असतील, तर रमाबाईंच्या त्यागाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल.

आजच्या आधुनिक समाजात कुटुंबव्यवस्थेवर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. अशा काळात रमाबाईंचे जीवन कुटुंबातील परस्पर सहकार्य, विश्वास आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित करते. त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयाला स्वतःचे ध्येय मानले. त्यांच्या संघर्षाला स्वतःचा संघर्ष समजले. म्हणूनच त्यांचे वैवाहिक जीवन केवळ संसार नव्हते, तर एका सामाजिक ध्येयासाठीची संयुक्त साधना होती.

रमाबाईंच्या आयुष्याकडे पाहताना आपल्याला स्त्रीच्या अदृश्य श्रमांचे महत्त्व समजते. घर सांभाळणे, मुलांची काळजी घेणे, संकटांना तोंड देणे आणि कुटुंबातील सदस्यांना मानसिक आधार देणे ही कामे समाज अनेकदा गृहीत धरतो. परंतु या कामांमुळेच मोठी स्वप्ने पूर्ण होतात. बाबासाहेबांच्या महान कार्यामागे रमाबाईंची हीच अदृश्य शक्ती कार्यरत होती.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजातील वंचित स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी प्रतिकूलतेतही स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आयुष्यातील दुःख आणि त्याग समजून घेतल्याशिवाय बाबासाहेबांच्या संघर्षाचे पूर्ण चित्र समोर येत नाही. म्हणूनच रमाबाईंच्या स्मृतीचा सन्मान करणे म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण अध्यायाला आदर देणे होय.

रमाबाईंचे जीवन आपल्याला शिकवते की मोठेपणा हा केवळ प्रसिद्धीत नसतो, तर निःस्वार्थी कार्यात असतो. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य इतरांसाठी जगण्यात गेले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महान वाटते. त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी समाजासाठी प्रेरणादायी आहे.

आज महिलांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. तरीही अनेक महिलांना संघर्ष करावा लागतो. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना मानसिक बळ देते. संकटांना सामोरे जाताना धैर्य आणि संयम कसे राखावे, हे त्यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे आहे.


रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे स्मरण करताना केवळ श्रद्धांजली वाहून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. समाजात समानता, माणुसकी आणि सहकार्याची भावना वाढवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत. बाबासाहेबांनी ज्या समतामूलक समाजाचे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाच्या उभारणीत रमाबाईंचा मूक पण महत्त्वपूर्ण वाटा होता.

भारतीय इतिहासातील अनेक स्त्रिया आपल्या त्यागामुळे आणि समर्पणामुळे स्मरणात राहिल्या आहेत. रमाबाई आंबेडकर यांचे नाव त्यामध्ये अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आयुष्यभर संकटांचा सामना केला, पण कधीही कर्तव्यापासून मागे हटल्या नाहीत. त्यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेतल्यास आपल्याला समाजातील विषमता आणि अन्यायाची जाणीव होते. त्याचबरोबर संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणाही मिळते. त्यांचे जीवन हे केवळ भूतकाळातील इतिहास नाही, तर वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारा संदेश आहे.

२७ मे हा दिवस रमाबाईंच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला त्याग, प्रेम, सहकार्य आणि माणुसकीची आठवण करून देतो. बाबासाहेबांच्या महान कार्याच्या पायाभरणीत रमाबाईंचे योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या शांत, संयमी आणि समर्पित जीवनामुळेच भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली.

रमाबाई आंबेडकर या भारतीय स्त्रीशक्तीचे एक तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांचे जीवन जितके साधे होते, तितकेच ते महान होते. त्यांनी संकटांशी सामना करत समाजपरिवर्तनाच्या इतिहासात आपले अजरामर स्थान निर्माण केले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना त्यांच्या जीवनमूल्यांचा स्वीकार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येकाने केली पाहिजे. कारण रमाईंचा त्याग, त्यांचे प्रेम आणि त्यांचे समर्पण हेच खऱ्या अर्थाने मानवतेचे आणि सामाजिक न्यायाचे अधिष्ठान आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# आत्मा अंतर्गत आयोजित 'भरडधान्य (मिलेट) लागवड'

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** आत्मा अंतर्गत सन २०२६-२७ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, भरडधान्य (मिलेट) हे कमी खर्चात, मातीची सुपीकता वाढवते, हवामान बदलास तग धरणारी पिके तसेच शाश्वत शेतीसाठी उत्तम पर्याय आहे. यामध्ये भगर, नाचणी व राळा या पीकांचे क्षेत्रात वाढ करणेसाठी निवडलेल्या शेतक-यांना मोफत प्रशिक्षण व बियाणे दिले जाणार आहे तसेच पिकवलेल्या मालाची खरेदी व विक्रीसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी सहभाग घेवू शकतात.

तरी वरील प्रमाणे इच्छुकांनी प्रकल्प संचालक, आत्मा सोलापूर या कार्यालयातील विक्रम फुटाणे मोबा क्रं. ९४२३२३२५६९ यांचेशी किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील (BTM) तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, (ATM) सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधुन मागणी अर्ज सादर करावा. मागणी अर्जामध्ये पुढील मुद्यांचा समावेश असावा.

१. शेतकऱ्यांचे नांव, गांव व तालुका, २. मोबाईल क्रमांक, ३. एकुण क्षेत्र, ४ मिलेट अंतर्गत पेरणी करावयाचे क्षेत्र व पीक, ५. त्यासाठी आवश्यक बियाणे.

पान १ वरून

# सर्व कंपन्यांनी पेट्रोल, डिझेल व...

अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी काही पेट्रोल पंप चालकाकडून ड्रम व मोठ्या प्रमाणात एकाच व्यक्तीला इंधन पुरवठा होत आहे, अशा तक्रारी ग्रामीण भागातून येत आहेत. तसेच अक्कलकोट करमाळा बार्शी या तालुक्यात इंधनपुरवठा विस्कळीत झाल्याबाबत ही तक्रारी येत असल्याने या भागातील पेट्रोल पंप सुरू राहतील या दृष्टीने कंपन्यांनी त्या ठिकाणच्या विक्रेत्यांना पुरवठा करावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

**जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्याकडून पंढरपूर येथील एका पेट्रोल पंपाची तपासणी**

सर्व तहसीलदार यांनी कोणत्याही पेट्रोल पंपावर इंधनाची कृत्रिम टंचाई होणार नाही याची दक्षता घ्यावी जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलच्या अनाधिकृत साठवणुकीसह काळाबाजार रोखण्यासाठी तसेच काही नागरिकाकडून पेट्रोल विक्रेत्याकडून पेट्रोल डिझेलचे शॉर्ट सेलिंग सुरू असल्याची तक्रारी आलेल्या होता, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पंढरपूर शहरातील एका पेट्रोल पंपावर तपासणी केली. या ठिकाणी सर्व बाबी व्यवस्थित असल्याचे आढळून आले. सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार यांनी तालुक्यातील कोणत्याही पेट्रोल पंपावर कृत्रिम टंचाई होणार नाही या दृष्टीने लक्ष ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या पेट्रोल पंपाची तपासणी करावी. व ग्राहकांना सुरळीत इंधन पुरवठा होईल यासाठी दक्ष राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिले.

**तालुकानिहाय संयुक्त भरारी पथक स्थापन –**

पेट्रोल पंपांवर डिझेल खरेदीसाठी रांगा लागल्याने काळाबाजार होण्याची शक्यता लक्षात घेऊन तालुका निहाय संयुक्त भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत. संयुक्त पथकात तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी समन्वयक म्हणून, पोलिस निरीक्षक कायदा व सुव्यवस्था प्रमुख म्हणून, तर निरीक्षक अधिकारी/नायब तहसीलदार तांत्रिक तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय मंडळ अधिकारी, पुरवठा निरीक्षक/सहा. महसूल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. वजन, मापे उपायुक्तांनी जिल्ह्यातील पेट्रोल पंपाचे क्लाबिरेशन( अचूकता तपासणी) व्यवस्थितपणे करावे

वजन व मापे कार्यालयाकडून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपाचे क्लाबिरेशन योग्य पद्धतीने केलेले आहे की नाही याची तपासणी करावी. ज्या पेट्रोल पंचाचे क्लबिरेशन योग्य नाही ते दुरुस्त करून योग्य प्रमाणात करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी उपायुक्त वजन व मापे यांना दिले.

## वात्रटिका

### दिल्ली वारी

मलाच पाहिजे म्हणताना
बिघडून गेले जागा सुत्र...
सुटेना तिढा आणि मग
नाराज झाला सत्ता मित्र...
गुपीत ठेवले किती तरी
ती गोष्ट शेवटी खरी आहे...
वाटाघाटी इथं नाहीत होत
त्यासाठी दिल्ली वारी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003

फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून रुपनवर यांना दोन लाखाचा धनादेश वाटप

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना' अंतर्गत केवळ ४३६ रुपयांच्या वार्षिक प्रीमियमवर २ लाख रुपयांचे जीवन विमा संरक्षण मिळते. विमेदाराचा नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाल्यास, अथवा गंभीर आजाराने मृत्यू ओढवल्यास वारसाला २ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळत असते भांब तालुका माळशिरस येथील सोमनाथ रुपनवर यांनी मुलगा निवृत्ती सोमनाथ रूपनवर वय १९ वर्ष याची ४३६ रुपए भरून नातेपुते येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रीमियम काढला होता. मात्र गेले चार-पाच महिन्यापूर्वी निवृत्ती सोमनाथ रूपनवर याचा मोटरसायकल अपघातात मृत्यू झाला असता १५ दिवसातच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत ४३६ रुपये भरून काढलेल्या प्रीमियमचा दोन लाखाचा लाभ वारसदार सोमनाथ रुपनवर यांना शाखा व्यवस्थापक आकाश बनकर, ऑफिसर आदित्य आंबुले, कॅशियर



रोहिणी बागल, यांच्या हस्ते सोमनाथ मारुती रूपनवर यांना देण्यात आला. यावेळी बँकेचे कर्मचारी श्रीकांत गायकवाढ, ज्ञानदेव खुडे, राजेंद्र खोमणे, सुनील वायदंडे उपस्थित होते.

अनेकांनी या योजनेचा लाभ घेतला असून नातेपुते येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत १३ शेच्यावर प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना' अंतर्गत ४३६ रुपयांचा वार्षिक प्रीमियम काढला असल्याची माहिती शाखा व्यवस्थापक आकाश बनकर यांनी दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीचे वय १८ ते ५० वर्ष एवढी वयाची मयार्दा आहे. अनेकांना या योजनेबद्दल माहिती नसल्याने अनेक लोक या योजनेपासून वंचित आहेत. ही योजना अतिशय लोकप्रिय आणि सोपी आहे.या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी ग्राहकांनी नातेपुते येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत येऊन माहिती घ्यावी असे आवाहन शाखा व्यवस्थापक आकाश बनकर यांनी ग्राहकांना केले आहे.

# जतन व संवर्धन आराखड्यातील सुरू असलेली कामे 25 जून पर्यंत पूर्ण करावी - जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत पडसाळ, देणगी कक्ष, अर्ध मंडप येथील पायऱ्या ही कामे 25 जून पर्यंत पूर्ण करावीत. तसेच पश्चिमद्वार चे काम तात्काळ सुरू करून आषाढी वारी पर्यंत पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन यांनी दिल्या.

आज जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन यांनी रिद्धी सिद्धी दर्शन मंडप, चंद्रभागा वाळवंट, सीसीटीव्ही कंट्रोल रूम, वाखरी पालखीतळ तसेच वाखरी ते पंढरपूर महामार्गाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या यावेळी त्यांच्या समवेत सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन म्हणाले, अधिक



मासातील एकादशीनिमित्त मंदिर समिती मार्फत दर्शन रांगेत भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष, भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा, शौचालय, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. दर्शन रांगेतील भाविकांचे जलद व सुलभ दर्शन व्हावे यासाठी व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. दर्शन रांगेत घुसखोरी करणारे तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी प्रांताधिकारी यांनी दररोज सीसीटीव्हीची पाहणी करावी व यामध्ये दोषी आढळल्यास तात्काळ कारवाई करावी. दर्शन रांग व मंदिर परिसरात आरोग्य सुविधा केंद्र वाढविण्यात येणार.सद्यस्थितीत दर्शनी मंडपाचे काम सुरू असून आषाढी वारीत पावसामुळे चिखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यावर आवश्यक ती उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात डिझेल पेट्रोल व गॅसची टंचाई नसून, पुरवठा सुरळीत सुरू आहे. आषाढी वारी कालावधीत देखील टंचाई निर्माण होणार नाही दक्षता घेण्यात आली आहे.आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्गावर ज्यादा जर्मनी हँगरची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. भाविकांना तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी टू व्हीलर ॲम्बुलन्सची संख्या वाढविण्यात येणार आहे. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये याची दक्षता घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहेत. शहरातील अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावीत. तसेच अतिक्रमण होणार नाही याबाबत कायमस्वरूपी नियोजन करण्यात यावे. मंदिर परिसरात फिरत्या विक्रेत्यांचा भाविकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने सदर विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करावी. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम सुरू असून वारी अगोदर साईड पट्टी स्वच्छ करण्याचे तसेच दोन्ही पुलावरील मुरमीकरण व सपाटीकरण 25 जून पर्यंत पूर्ण करावे. नगरपालिकेने नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत. खाद्यपदार्थांच्या दुकानाची वेळोवेळी तपासण्या करण्यासाठी अन्न औषध प्रशासनाकडून ज्यादा पथके नेमण्यात येणार आहेत. चंद्रभागा नदी पात्रातील होडी चालकांना भाविकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी लाइफ जॅकेट देण्यात येणार आहेत. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी कोणत्याही भाविकांनी पैसे देऊ नयेत. दर्शन निशुल्क असल्याबाबतचे फलक दर्शनी भागात लावावेत. अशा सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिल्या.

अधिकमासातील कमला एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी चार ते पाच लाख वारकरी भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर समिती मार्फत करण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबतची जिल्हाधिकारी यांनी माहिती घेतली.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी अधिक मासानिमित्त वारकरी भाविकांच्या सोयी सुविधेसाठी दर्शन रांग दर्शन मंडप येथे करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली तसेच मंदिर जतन व संवर्धन आराखड्याअंतर्गत पूर्ण झालेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

# स्वनिधीतूनच होणार करमाळा बाजार समितीच्या उर्वरित रस्त्यांचे काँक्रीटीकरण - जयवंतराव जगताप

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील प्रमुख रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली असून ही सर्व कामे कोणत्याही वित्तीय संस्था अथवा बँकेचे कर्ज न घेता पूर्णपणे स्वनिधीतून करण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी दिली. तसेच बाजार समितीतील उर्वरित अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरणही लवकरच हाती घेण्यात येणार असून ती कामेही स्वनिधीतूनच करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना जगताप यांनी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. देशभक्त कै. नामदेवराव जगताप यांनी १९४८ साली करमाळा तालुका व परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाने पिकवलेल्या शेतमालासाठी स्वतःची हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने बाजार समितीची स्थापना केली. त्यानंतर करमाळा व जेऊर येथे जागा खरेदी व संपादन करून बाजार समितीत आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सुविधांमुळे शेतकरी, व्यापारी, हमाल-तोलार तसेच इतर घटकांच्या आर्थिक उन्नतीला मोठी चालना मिळाली आणि करमाळा शहराची बाजारपेठ सर्वांगाने विकसित होत गेली.

बाजार समितीचा व्याप वाढत असताना उत्पन्नवाढीच्या नव्या स्रोतांची गरज भासू लागली. १९८९ साली बाजार समितीची सूत्रे हाती घेतल्यानंतर बाजार समितीच्या उत्पन्नवाढीसाठी नगर रोड व जामखेड रोड परिसरातील वॉल कंपाऊंडलगत शॉपिंग सेंटर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली तसेच शेकडो सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली, असेही जगताप यांनी नमूद केले.

यासोबतच बाजार समितीमध्ये सेल हॉल, गोदामे, रयत भवन, कार्यालयीन इमारत, शेतकरी निवास, धान्य चाळणी यंत्रणा आदी सुविधा उभारण्यात आल्या. शेतकरी व व्यापाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांच्या सुलभतेसाठी मार्केट यार्ड परिसरात डीसीसी बँकेची शाखा सुरू करण्यात आली. रस्ते, वीज व पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून बाजार समिती अधिक सक्षम करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

करमाळा बाजार समितीत शेतकऱ्यांसमक्ष उघड लिलाव पद्धतीने व्यवहार होतात. विक्री



केलेल्या शेतमालाची पट्टी २४ तासांच्या आत देण्यात येते. तसेच पदाधिकारी, व्यापारी, शेतकरी, हमाल-तोलार यांच्यातील समन्वयामुळे करमाळा बाजारपेठेवर शेतकरी व खरेदीदारांचा मोठा विश्वास असल्याचे जगताप यांनी सांगितले. त्यामुळे करमाळा तालुक्यासह आसपासच्या जिल्ह्यांमधूनही मोठ्या प्रमाणावर शेतमाल विक्रीसाठी करमाळा बाजारात येत असून करमाळा बाजारपेठेची विश्वासार्ह बाजारपेठ म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

गतवर्षी अतिवृष्टीमुळे बाजार समितीच्या उत्पन्नावर काही प्रमाणात परिणाम झाला असला तरी पारदर्शक व काटकसरी कारभारामुळे बाजार समिती आर्थिकदृष्ट्या सक्षम राहिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आगामी काळात उत्पन्नवाढीवर विशेष भर देऊन शेतकऱ्यांसाठी विविध नवीन योजना राबविणे तसेच अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे संचालक या नात्याने संघाच्या शिष्टमंडळासह पणनमंत्री ना. जयकुमार रावल यांची भेट घेऊन राज्यात 'भावांतर भुगतान योजना' लागू करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचेही जगताप यांनी सांगितले. ज्या शेतकऱ्यांनी बाजार समितीमध्ये शेतमाल विक्री केला असून हमीभावापेक्षा कमी दर मिळाला असेल, अशा शेतकऱ्यांना शासनाने मध्यप्रदेश सरकारच्या धर्तीवर फरकाची रक्कम देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अखेर विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपये जमा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय पेन्शन योजना आणि परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे पैसे मागील ऑगस्ट 2025 पासून त्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याची धक्कादायक माहिती सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनने समोर आणली होती. तसे निवेदनही युनियनचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे यांच्या नेतृत्वाखाली उच्च शिक्षण सोलापूर विभागाचे सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना दिले होते.

त्यानुसार 'विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपये रखडले,' असे वृत्त 20 मे रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाने याची दखल घेत 21 मे रोजी कार्यवाही ही केली. एका विभागातून दुसऱ्या विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत तफावत असल्यामुळे चलन जनरेट होत नव्हते. ही त्रुटी त्यांनी दूर केली. आणि सर्वांची ही रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सोलापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने 21 व 22 मे रोजी पूर्ण केली.

1 नोव्हेंबर 2005 नंतर नियुक्त झालेल्या प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दरमहा वेतनातून कर्मचारी हिस्सा 10 टक्के आणि शासन हिस्सा 14 टक्के अशी एकूण 24 टक्के रक्कम कपात केली जाते. मात्र, मागील 9 महिन्यांपासून ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक 'प्रान' खात्यावर जमा झालेली नव्हती. यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान आणि त्यांच्यात तीव्र संतापाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. याची दखल कॉलेज कर्मचारी युनियनने निवेदन देऊन केली होती तसेच सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनीही एका पत्राद्वारे लक्ष वेधले होते. याची कार्यवाही न झाल्यास 27 मे पासून विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयासमोर विविध टप्प्यावर आंदोलन सुरू करण्याचा ईशारा सुटाचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे व प्रमुख कार्यवाह डॉ. भगवान आदटराव यांनी दिला होता.

**वृत्तपत्रातील प्रसिद्धीमुळे न्याय**



सोलापूर विभागातील प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे 730 जणांची दरमहा पाऊने दोन कोटीची रक्कम ऑगस्ट 2025 पासून चलन जनरेट होत नसल्यामुळे वरिष्ठ कार्यालयाकडे जमा होती नव्हती. या त्रुटीसाठी 9 महिने झाले होते. परंतु याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाची यंत्रणा हलली. अखेर ही रक्कम जमा झाली आणि आम्हांला न्याय मिळाला. याबद्दल कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने आभार.

**-दत्ता भोसले,** अध्यक्ष
कॉलेज कर्मचारी युनियन, सोलापूर

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी शिवप्रेमी युवकांचे ग्रामपंचायतीला निवेदन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** मौजे टेंभुर्णी येथे लोकसहभागातून व बोबडे गटाच्या पुढाकाराने उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकाच्या कामास जुन्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीमुळे तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने संबंधित टाकीची तात्काळ तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी शिवप्रेमी युवकांच्या वतीने टेंभुर्णी ग्रामपंचायतीकडे करण्यात आली आहे.

टेंभुर्णी गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अष्टधातूचा अश्वरूढ पुतळा उभारण्यात येणार असून परिसराचे आकर्षक सुशोभीकरणही करण्यात येणार आहे. अंदाजे १ ते १.५ कोटी रुपये खर्चाच्या या स्मारकासाठी लोकसहभागातून निधी उभारला जात असून बोबडे गटाच्या माध्यमातून या कामाला गती देण्यात येत आहे. मात्र स्मारकाच्या जागेजवळील जुनी पिण्याच्या पाण्याची टाकी धोकादायक स्थितीत असल्याने स्मारकाच्या कामात अडथळे निर्माण होत असल्याचे समोर आले आहे.

याच पार्श्वभूमीवर बोबडे गट प्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य



ऋषिकेश (बंटी नाना) मोहनराव बोबडे यांच्या नेतृत्वाखाली शिवप्रेमी युवकांनी ग्रामपंचायतीला निवेदन सादर केले. निवेदनामध्ये जुन्या पाण्याच्या टाकीची तात्काळ तांत्रिक तपासणी करण्यात यावी, टाकी धोकादायक असल्यास नियमानुसार पाडण्यात यावी तसेच स्मारकाच्या कामासाठी आवश्यक सर्व प्रशासकीय परवानग्या व सहकार्य तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी बोलताना ग्रामपंचायत सदस्य ऋषिकेश बोबडे म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या स्मारकाचे काम हे कोणत्याही एका गटाचे नसून संपूर्ण गावाच्या अस्मितेचे प्रतीक आहे. पाण्याच्या टाकीची अडचण दूर करून स्मारकाचे काम लवकर पूर्ण व्हावे, हीच आमची भूमिका असून या पवित्र कामात कोणीही राजकारण आणू नये.'

सदर निवेदन देताना गिरीश तांबे, शकर भरगडे, संदीप साळवे, विशाल नवगीरे, पप्पू तांबे, संदीप देशमुख, सुरज देशमुख, अमित देशमुख, शुभम देशमुख, नागेश खरसाडे, दादा देवकर, अमोल देशमुख, श्रावण खरसाडे, प्रविण चव्हाण, ऋषिकेश चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने शिवप्रेमी युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, ग्रामपंचायतीने या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**आडवे शब्द :** १) खा. सुनील तटकरे यांचा लोकसभा मतदारसंघ ४) जोतिबा, अंबाबाई देवस्थान पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे ७) या राज्याची राजधानी पणजी आहे ८) सिंहाचे जोराचे ओरडणे १०) धांदल, घाई १२) अनिल कपूर अभिनीत एक राजकारणावर आधारित चित्रपट १३) उन्हाळ्यातील एक महिना १४) दुप्पट (इंग्रजीत) १५) कागदाचे वीस दस्त्यांचे माप, सायकलचे चाक १६/अ) श्रीगणेशाचा एक मंत्र-* गं गणपतये नमः १८) मोठा ढोल १९) दमयंती पती २०) बिहारमधील मंत्री गिरीराजसिंह यांचा लोकसभा मतदारसंघ २१) विनाकारण, नाहक २३) बनावट २८) विठ्ठल भक्तांचे पंढरीला पायी जाणे ३०) मार्ग, रस्ता ३१) राजाचे भव्य निवासस्थान ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा लोकसभा मतदारसंघ ३४) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** ३५) याचे कणीस भाजून खातात ३७) श्वसनेंद्रिय ३८) चालरूढ, पध्दत ४०) सात गुणिले तीन ४२) आश्चर्य ४४) तिरस्कार (हिंदीत) ४६) शिक्षकांना या नावाने संबोधतात ४७) पोलीस दलाच्या वाहनांच्या येण्याची सूचना करण्यासाठी मोठा आवाज करणारे लावतात ते ४८) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४९) मोफत (इंग्रजीत)

**उभे शब्द :** १) देशाचे संरक्षणमंत्री २) देशाचे रस्ते वाहतूक व बांधकाम मंत्री-नितीन **** ३) भीती (हिंदीत) ४) मच्छीमारी करून उदरनिर्वाह करणारा वर्ग ५) नदीवर बांधलेला साकव, ब्रीज ६) पुष्कळ, भरमसाठ ७) सावकाश मंद गतीने चालणारा एक छोटा प्राणीजीव ९) श्रवणेंद्रिय ११) एक माजी मंत्री-***** पाचपुते १६) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १७) भारताचा माजी कर्णधार व सध्या बीसीसीआय अध्यक्ष - सौरभ *** २०) ब्रेड, केक इत्यादी पदार्थ जेथे बनविले जातात ती जागा २२) शर्ट (ग्रामीण भाषेत) २३) पाकचे माजी पंतप्रधान २७) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना २९) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ३०) लष्करातील सैनिकाला शौर्याबद्दल दिले जाणारे मेडल-***** चक्र ३१) वाळवंट प्रदेश असलेले भारतातील राज्य ३२) लायब्ररी (मराठीत) ३३) चार गुणिले चार ३६) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी जगप्रसिध्द असलेले पठार ३९) जरचा साथीदार ४१) कौशल्य ४३) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास ४४) ख्रिश्चन धर्मसेविका ४५) टिकून राहणे, गत उलट लिहा

## सुडोकु - 260

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | | | 2 | 4 | 9 | |
| | | | | | 5 | 2 | | |
| 2 | 8 | 4 | | 1 | 6 | 7 | | |
| | 4 | 9 | | | 3 | 8 | 2 | |
| | | | 5 | | | | | 9 |
| | 7 | 2 | | 9 | 4 | | 3 | 1 |
| | | 5 | 7 | 3 | 8 | 9 | | 2 |
| | 6 | | | | | 1 | | |
| | 2 | | 6 | | 1 | 3 | | 4 |

# सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल काळाबाजार रोखण्यासाठी संयुक्त भरारी पथक स्थापन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलच्या अनाधिकृत साठवणुकीसह काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या आदेशानुसार तालुकानिहाय संयुक्त भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे.

पेट्रोल पंपांवर डिझेल खरेदीसाठी रांगा लागल्याने काळाबाजार होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली आहे. विनापरवाना पेट्रोलियम उत्पादनांची साठवणूक करून चढ्या दराने विक्री करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

संयुक्त पथकात तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी समन्वयक म्हणून, पोलिस निरीक्षक कायदा व सुव्यवस्था प्रमुख म्हणून, तर निरीक्षक अधिकारी/नायब तहसीलदार तांत्रिक तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय मंडळ अधिकारी, पुरवठा निरीक्षक/सहा. महसूल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

नियुक्त पथक तहसीलदारांच्या नेतृत्वाखाली छापेमारी करून काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करेल व त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करेल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पत्नीचा खून करून फरार झालेल्या आरोपीस बार्शी तालुका पोलिसांकडून अटक

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील बाशी-परांडा रोडवरील प्रविण हॉटेलजवळ पत्नीचा खून करून फरार झालेल्या आरोपीला बार्शी तालुका पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली असून गुन्ह्यात वापरलेले धारदार हत्यारही जप्त करण्यात आले आहे.



दिनांक 25 मे 2026 रोजी सकाळी सुमारे 10:15 वाजण्याच्या सुमारास धनश्री ऋषीकेश पाटील या महिला बचत गटाचे काम करून लक्ष्याचीवाडी येथून बार्शीकडे ज्युपीटर दुचाकीवरून परत येत होत्या. यावेळी प्रविण हॉटेलजवळ आरोपी ऋषीकेश संभाजी पाटील (रा. नागणे प्लॉट, परांडा रोड, बार्शी) याने त्यांना अडवून चारित्र्यावर संशय घेत धारदार हत्याराने गळा, मान व पोटावर वार केले.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक महेश माने व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी महिलेला ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी फियार्दी जितेंद्र विश्वनाथ गायकवाड (रा. कासारवाडी, ता. बार्शी) यांच्या तक्रारीवरून बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 151/2026 नुसार इठर कलम 103(1) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यानंतर आरोपी फरार झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दोन पथके तयार करून शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान आरोपीला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. चौकशीमध्ये आरोपीने गुन्ह्यातील हत्यार लपवून ठेवल्याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी दोन पंचांसमक्ष फिंगरप्रिंट पथक, डॉग स्कॉड आणि फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने ते हत्यार जप्त केले.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक महेश माने हे करीत असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्येक मंगळवार हा दिवस 'नो व्हेईकल डे' म्हणून घोषित

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरने पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 18 मे च्या परिपत्रकानुसार प्रत्येक आठवड्यातील मंगळवार हा दिवस "नो व्हेईकल डे" म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल विभागाच्या विविध शाखा अंतर्गत 30 कर्मचारी इलेक्ट्रिक बाईकवरून तर 12 अधिकारी- कर्मचारी सायकल चालवत कार्यालयात आले. तर अनेक कर्मचारी सार्वजनिक वाहतूक आणि खाजगी वाहतूक व्यवस्थेचा वापर करून कार्यालयात आले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखा, उपविभागीय कार्यालये व तहसील कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी यांना या दिवशी खाजगी दुचाकी व चारचाकी वाहने कार्यालयात आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. अपरिहार्य कारणाशिवाय शासकीय वाहनांचा वापरही टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या उपक्रमाचा उद्देश इंधन बचत, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर वाढवणे तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा आहे. अधिकारी व कर्मचारी यांनी बस, सायकल, इलेक्ट्रिक वाहन किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य द्यावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. या नुसार सर्व शाखा प्रमुख, उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयांना आदेश देण्यात आले असून, "नो व्हेईकल डे" चे पालन अनिवार्य राहील असे स्पष्ट करण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक शंकर कांबळे व विजय वाळा इलेक्ट्रिक बाइक ने कार्यालयात आले


आज जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक अधिकारी कर्मचारी इलेक्ट्रिक बाइक तसेच ऑटो नी येताना दिसून आले. जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे आणि विजय वाळा हे इलेक्ट्रिक बाइकने कार्यालयात आले. प्रधानमंत्री महोदय यांच्या आव्हानाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी डिझेल व पेट्रोलच्या गाड्यांचा वापर कमी करून उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

शासन परिपत्रकान्वये तसेच पंतप्रधान यांनी, पश्चिम आशियाई पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना आवाहन केले आहे. ज्यामध्ये घरून काम करण्याची मुभा (Work From Home), अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करून नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनाचा वापर वाढवणे व परदेश दौरे टाळणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. यानुसार उपरोक्त आदेश काढण्यात आलेले आहेत.

# अक्कलकोटच्या इतिहासात प्रथमच डेरेदार झाडांचे पुन:प्रत्यारोपण

## नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचा अभिनव उपक्रम

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहराच्या इतिहासात प्रथमच डेरेदार झाडांचे पुन:प्रत्यारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा अभिनव आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या 'पर्यावरणपूरक विकसित अक्कलकोट शहर' या उद्दिष्टाला अनुसरून नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम प्रत्यक्षात साकार झाला असून शहरभरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.



सध्या एमएसईबी चौक ते बायपास रोड या रस्त्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान रस्त्यालगतची जुन्या पिंपळ-वडाची डेरेदार झाडे तोडली जात असल्याचे नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या निदर्शनास आले. त्यावेळी त्यांनी तत्काळ गाडी थांबवून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि झाडे पूर्णपणे तोडण्याऐवजी त्यांचे पुन:प्रत्यारोपण करण्याचे आदेश दिले.

नगराध्यक्षांच्या सूचनेनुसार अंदाजे १२ ते १३ डेरेदार झाडे क्रेनच्या सहाय्याने काळजीपूर्वक उपटून शहरातील विविध भागात स्थलांतरित करण्यात आली. ज्या ठिकाणी झाडांची योग्य वाढ होईल आणि पर्यावरणाला अधिक फायदा होईल अशा ठिकाणी ही झाडे पुन्हा लावण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे, शहरातील रस्त्यांच्या कडेला असलेली इतर डेरेदार झाडे देखील भविष्यात अशाच पद्धतीने स्थलांतरित करून त्यांचे संवर्धन करण्यात येणार असल्याच्या सूचना नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अक्कलकोट नगरपरिषदचे मुख्याधिकारी रमाकांत डाके साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही तितक्याच गांभीर्याने पार पाडण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला असून, अक्कलकोट शहरासाठी हा उपक्रम एक आदर्श ठरत आहे.

# पावसाळ्यापूर्वी मनपाची तयारी; महापौर कोंड्याल यांची नाल्यांची पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी तुंबण्याच्या समस्या उद्भवू नयेत तसेच नाल्यांमधील पाण्याचा सुरळीत प्रवाह कायम राहावा यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज शहरातील विविध नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. ही पाहणी महापौर विनायक कोंड्याल यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.



यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अक्कूलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि त्या त्या प्रभागातील नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पाहणी दौऱ्यात अक्कलकोट रोडवरील पंजवाणी मार्केट परिसरातील नाला, मुद्रा सनसिटी येथील नाला, घरकुल परिसरातील पोगुल नाला, कारबा नाका, बाळे परिसर तसेच एम. आय.डी.सी. परिसरातील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी नाल्यांची स्वच्छता, पाण्याचा प्रवाह, अतिक्रमणे, गाळ साचलेली ठिकाणे आणि पाण्याचा निचरा सुरळीत होत आहे का याची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांनी पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नाल्यामध्ये मिश्रित होणारे सांडपाणी, दूषित पाणी अथवा अन्य पाण्याचे स्रोत याबाबत सखोल चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिले. ज्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह अडथळ्यांमुळे मंदावलेला दिसून आला, त्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, 'पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, शहरात पाणी साचू नये आणि नाल्यांमधील पाण्याचा निचरा सुरळीत राहावा यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची नियमित स्वच्छता, पाहणी आणि आवश्यक दुरुस्तीची कामे केली जात आहेत. ज्या ठिकाणी समस्या आढळतील त्या तात्काळ सोडवण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.'

या पाहणी मोहिमेमुळे शहरातील नाला स्वच्छता आणि पावसाळी पूर्वतयारीच्या कामांना अधिक गती मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# गोकुळ साखर कारखान्याने थकीत ऊस बिल तात्काळ द्यावे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** धोत्री येथील शेतकऱ्यांनी सोमवारी साखर उपआयुक्त विजय गावडे यांची भेट घेऊन गोकुळ साखर कारखान्याकडील थकीत ऊस बिल तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी केली. रयत क्रांती संघटनेच्या वतीने याबाबत निवेदन सादर करण्यात आले.

रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण काशिनाथ बिराजदार तसेच जिल्हा सरचिटणीस रमेश अण्णा भंगे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, गोकुळ साखर कारखाना, धोत्री येथील शेतकऱ्यांचे सन २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या गळीत हंगामातील ऊस बिल अद्याप प्रलंबित आहे. धोत्री परिसरातील काही शेतकऱ्यांची एकूण १ लाख २९ हजार रुपयांची रोख रक्कम कारखान्याकडून देणे बाकी असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कारखान्याकडून नियमानुसार वेळेत बिल न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न तसेच शेतीसाठी लागणारा खर्च भागविणे कठीण झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल तातडीने त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

तसेच कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या दूषित पाण्यामुळे शेतजमिनींचे नुकसान होत असल्याचाही आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# शासकीय निवासी शाळा नजिक पिंपरी येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या नजिक पिंपरी (ता. मोहोळ) येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ६ वी ते १० वी सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अशी माहिती मुख्याध्यापक आण्णासाहेब शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना कोणतीही फी न आकारता मोफत प्रवेश दिला जात असून निवास, भोजन, पाठ्यपुस्तके, वह्या, शैक्षणिक साहित्य, शालेय व क्रीडा गणवेश, शूज, स्कूल बॅग आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच अद्ययावत जिम, क्रीडा साहित्य, आउटडोअर जिम, शुद्ध पिण्याचे पाणी, गरम पाण्याची सुविधा, इन्व्हर्टर, २४ तास सुरक्षा रक्षक, अभ्यासिका व सीसीटीव्ही निगराणीखाली सुरक्षित परिसर उपलब्ध आहे.

शाळेमध्ये डिजिटल क्लासरूम, विज्ञान विषयासाठी आधुनिक AR-VR प्रयोगशाळा, ई-लायब्ररी, वाय-फाय सुविधा व संगणक कक्ष उपलब्ध असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रम राबविण्यात येतात. एनसीसी, स्काऊट-गाईड, शैक्षणिक सहली, क्षेत्रभेटी, वनभोजन तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम असून शिष्यवृत्ती व क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रवेश अर्ज शासकीय निवासी शाळा, नजिक पिंपरी तसेच सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. प्रवेशासाठी जागा प्रवर्गनिहाय आरक्षित असून अनुसूचित जाती व नवबौद्ध - ८० टक्के, अनुसूचित जमाती - १० टक्के, विजाभज - ५ टक्के, दिव्यांग - ३ टक्के व एसबीसी - २ टक्के प्रमाणे प्रवेश दिला जाणार आहे.

प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी पालकांनी मुख्याध्यापकांशी 9011350908 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शाळा प्रशासनाने केले आहे.

# सोलापूर ग्रामीण भागात मनाई आदेश लागू - १५ दिवसांसाठी निर्बंध

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण भागात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) अ ते फ अन्वये मनाई आदेश जारी केले आहेत. हा आदेश दि. 27 मे 2026 रोजी रात्री 8 वाजता लागू झाला असून तो दि. 10 जून 2026 रोजी मध्यरात्री 20.00 वाजेपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशानुसार शस्त्रे, अग्निशस्त्रे, तलवारी, भाले, दंडुके, चाकू, लाठ्या, स्फोटके, क्षेपणास्त्रे, उपरोधिक पदार्थ तसेच सार्वजनिक ठिकाणी टिकाकरण, उत्तेजक गाणी, संगीत वाजवणे, अश्लील चित्रे किंवा चिन्हे प्रदर्शित करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून जप्त केलेली शस्त्रे व वस्तू राज्य सरकारकडे जमा करण्यात येतील.

तसेच पाच किंवा अधिक व्यक्तींच्या संमेलनास, मिरवणुकीस, लाऊडस्पीकर, वाद्ये, बँड व फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र विवाह समारंभ, अंत्यसंस्कार, कायदेशीर सभा, शैक्षणिक उपक्रम, कारखाने, दुकाने, चित्रपटगृहे, नाटकगृहे, सरकारी कार्ये व परवानगी दिलेल्या संमेलनांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

हा आदेश सोलापूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, न्यायालये व सरकारी कार्यालयांमध्ये चिकटवून तसेच लाऊडस्पीकर, मेगाफोन व प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये 'ऑनलाइन' प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाज कल्याण आयुक्तालयाच्या दि. 25.05.2026 च्या परिपत्रकानुसार सन 2026-27 करिता शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. निवास, भोजन, शैक्षणिक साहित्यासह सर्व सुविधा शासनाकडून 100% मोफत. विद्यार्थ्यांनी, http://hmÔs.mahait.org या अधिकृत पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन.

ग्रामीण व दुर्गम भागातील कष्टकरी, शेतमजूर आणि मागासवर्गीय कुटुंबातील मुला-मुलींना शहराच्या ठिकाणी राहून उच्च व व्यावसायिक शिक्षण घेता यावे, यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. महाराष्ट्र शासन समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या परिपत्रक क्र. सकआ/शिक्षण/शावगृ/वसतिगृह प्रवेश/2026-27, दिनांक 25.05.2026 अन्वये सोलापूर जिल्ह्यातील 16 शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी प्रवेशाचे वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे.

प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे 'ऑनलाइन' पद्धतीने राबविली जात असून पात्र विद्यार्थ्यांनी, http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन सुलोचना सोनवणे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांनी केले आहे.

**प्रवेशाचे वेळापत्रक (सन 2026-27):**

आयुक्तालयाच्या परिपत्रकानुसार स्थानिक शाळा व महाविद्यालयांच्या निकालानुसार प्रवेशाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

- अभ्यासक्रम / वर्ग-शालेय विभाग (इयत्ता 8 वी)-
- ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक- 30 जून 2026 पर्यंत
- इयत्ता 11 वी व 12 वी- ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक- 15 जुलै 2026 पर्यंत
- बीगर व्यावसायिक अभ्यासक्रम (पदवी B.A./B.Com/B.Sc.)- ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक- दि.15 जुलै 2026 पर्यंत

व्यावसायिक अभ्यासक्रम इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी, लॉ, पॉलिटेक्निक यांच्या प्रथम वर्ष प्रवेशाचे वेळापत्रक त्यांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनुसार स्वतंत्रपणे राहील.

**सोलापूर जिल्ह्यातील 16 शासकीय वसतिगृहांची स्थिती:**

जिल्ह्यात मुलांची 9 आणि मुलींची 7 अशी एकूण 16 शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत.

मुलांची वसतिगृहे (एकूण 09): सोलापूर शहर (2), बार्शी (2), अक्कलकोट (1), माढा (1), पंढरपूर (1), करमाळा (1) आणि अकलूज (1).

मुलींची वसतिगृहे (एकूण 07): सोलापूर शहर (1), अक्कलकोट (1), मोहोळ (1), कुडूवाडी (1), बार्शी (1), पंढरपूर (1) आणि माळशिरस (1).

वसतिगृहात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण खर्च शासनामार्फत केला जातो. यामध्ये निवास, दोन वेळचे सकस भोजन, नाश्ता, दूध, फळे, अंडी, आठवड्यातुन दोन वेळा मांसाहरी भोजन तसेच वह्या-पुस्तके, गणवेश, छत्री, रेनकोट, गमबुट इत्यादी शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात दरमहा निर्वाह भत्ता जमा केला जातो. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व कौशल्याधारित विकासासाठी वसतिगृहात सुसज्ज ग्रंथालय आणि आधुनिक संगणक लॅबची सुविधाही उपलब्ध आहे.

**पात्रता आणि प्रवेशाचा निकष -**

या शासकीय सुविधेचा लाभ अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विजाभज (VJNT) व विशेष मागास प्रवगार्तील (SBC), आर्थिक मागास, अनाथ आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना घेता येईल. सदरची सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तेवर व सामाजिक आरक्षणावर आधारित असेल.

ऑनलाइन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास त्यांनी कार्यालयीन वेळेत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सोलापूर व संबंधित शहराच्या शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांशी समक्ष भेटून मार्गदर्शन घ्यावे.

"उच्च शिक्षणासाठी सोलापूर जिल्ह्यात येणाऱ्या ग्रामीण भागातील गरजू व गुणवंत विद्याथ्यर्थ्यांनी समाज कल्याण आयुक्तालयाच्या वेळापत्रकानुसार मुदतीत ऑनलाईन अर्ज भरून या सुविधेचा लाभ घ्यावा. केवळ आर्थिक परिस्थितीअभावी कोणाचेही शिक्षण सुटू नये यासाठी सामाजिक न्याय विभाग कटिबद्ध आहे." अशी माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी दिली.

# वर्षानुवर्षे प्रलंबित ड्रेनेज समस्येला अखेर मार्ग; उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची पुढाकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्र. २३ मधील साईदीप नगर, अथर्व रेसिडेन्सी आणि शाईन नगर परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ड्रेनेज समस्येच्या निराकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा नेते मनीष देशमुख यांच्या सूचनेनुसार उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.



ड्रेनेज विभागाचे अधिकारी श्री. रामचंद्र पेंटर, विभागीय कार्यालय क्रमांक ६ चे अधिकारी श्री. पानगल, कनिष्ठ अभियंते व कर्मचारी यांच्या उपस्थितीत नागरिकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर रखडलेल्या ड्रेनेज कामाला अखेर मार्ग मोकळा झाला.

तीव्र उन्हातही उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी परिसरात प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत उपमहापौरांचे आभार मानले.

यावेळी नगरसेवक राजशेखर पाटील, सत्यजित वाघमोडे, भाजप दक्षिण पश्चिम मंडल अध्यक्ष महेश देवकर तसेच महानगरपालिका अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.